ठाणे, शनिवार दि. १० ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०३ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

अशांततेचे देश

अमेरिकेने नुकतीच एक नवीन ट्रॅव्हल डव्हायझरी जारी केली आहे. ज्यामध्ये अमेरिकन नागरिकांना बांगलादेशसह अनेक देशांमध्ये प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे.

.....पान २ वर

नवी मुंबईतील ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफी

...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper
PDF
www.maharashtrasamrat.com

तापमान

कमाल ३६° से | किमान २९° से

बाजार

सोने	चांदी
७३,२८०	९३,६८०

डोकं खाजवा –अशोक सुतार

काय हो जनाभाऊ,या खड्ड्यांच्या मागे अनेक अदृश्य शक्ती असल्याचा भास मला नेहमीच होतो !

लोकसभा निवडणुकीत १ लाख ६६ हजार ९१० बोगस मतदान

रात्री उशिरा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या शिष्टमंडळाने घेतली ठाणे जिल्हाधिकाऱ्यांची भेट...

(सविस्तर वृत्त पान २)

मुख्यमंत्र्यांनी आसनगाव येथील रेल्वेवरील पुलाची केली पाहणी

ठाणे – मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आसनगाव येथे रेल्वेच्या ट्रॅक वर असलेल्या पूलाची पाहणी केली. यावेळी स्थानिक नागरिकांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे काम व्यवस्थित होत नाही त्याचबरोबर या ठिकाणी कर्मचारी गावकऱ्यांशी उद्धटपणे वागतात अशी तक्रार केली यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित ठेकेदाराच्या माणसाला बोलावून आणि पोलिस कारवाई करण्याचा दम दिला. काम व्यवस्थित झालं नाही तर डायरेक्ट एफ आय आर करू असे सुद्धा सांगितले. काम लवकर होण्यासाठी मनुष्यबळ वाढवण्यास सांगितले आणि तसे फोटो काढून पाठवायला सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताफ्यालाही वाहतूक कोंडीचा फटका ठाणे शहापूर रस्त्याचे पाहणी करत असताना वाहतूक कोंडीचा मुख्यमंत्र्यांना बसला फटका...

डम्पिंग ग्राऊंड बंद करा...

ठाण्यात शिवसेना (उबाठा) व भाजपच्यावतीने जोरदार निदर्शने

(छाया , मनोज सिंह)



ठाण्यातील वागळे इस्टेट येथील ठाणे महापालिकेचे सी पी तलाव डम्पिंग ग्राऊंड कायमचे बंद करा या मागणीसाठी भाजपा व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने एकत्रित आंदोलन करण्यात आले यावेळी डम्पिंग ग्राऊंडवर येणाऱ्या कचऱ्याचा गाड्या अडवण्यात आल्या होत्या.

ठाणे: वागळे इस्टेट येथील डम्पिंग ग्राऊंड बंद करण्याच्या मागणीसाठी आज शिवसेना उबाठा व भाजप च्या कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन केले. वागळे इस्टेट परिसरातील नागरिकांना या डम्पिंग ग्राऊंडमुळे होणाऱ्या त्रासाचा विरोध दर्शवत कार्यकर्त्यांनी ठाणे महापालिकेच्या विरोधात यावेळी घोषणाबाजी करण्यात आली.

दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक हैराण

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सीपीतला परिसरात सुरू करण्यात आलेला डम्पिंग राऊंडमुळे स्थानिकांना मोठ्या प्रमाणामध्ये दुर्गंधीचा सामना करावा लागतो. त्याचबरोबर विविध आजारांच्या समस्याला सामोरे जावे लागते.सदर परिसरामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये डम्पिंगच्या गाड्यांची रांग लागलेली असते. (पान २ वर)

डंपिंग ग्राऊंडच्या गेटला टाले ठोकुन व्यक्त केला रोष

आंदोलना दरम्यान कार्यकर्त्यांनी डंपिंग ग्राऊंडच्या गेटला टाले ठोकुन आपला रोष व्यक्त केला. त्यांनी असा आरोप केला की, डम्पिंग ग्राऊंडमुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे, तसेच आरोग्याच्या समस्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे. स्थानिक नागरिकांचीही या मागणीला मोठ्या प्रमाणात साथ मिळत आहे. काही दिवसांपूर्वी आंदोलन केल्यानंतर स्थानिक शिवसेना नेत्यांनी पालिका अधिकाऱ्यांशी भेट घेतली होती व या भेटीदरम्यान हे डम्पिंग ग्राऊंड येथून हटवण्याचं कागदपत्रे केवळ आश्वासन दिलं होतं मात्र मुदत उलटून गेली तरी हे डम्पिंग ग्राऊंड अद्याप न हटवल्यामुळे या ठिकाणी असलेल्या परिसरातील नागरिक तसेच आजूबाजूच्या इंडस्ट्रियल एरिया मधील कर्मचारी आक्रमक झाले आहेत. पालिका प्रशासनाने कागदावरती खोटे आश्वासन दिल्याने स्थानिक नागरिक नाराज झाले आहेत.

वागळे इस्टेट सी पी टँक परिसरातील नागरिकांना मिळणार दिलासा

कचरा विकेंद्रीकरणासाठी महापालिकेची पर्यायी योजना

ठाणे (०९) : मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे महापालिकेस क्षेपणभूमी तयार करण्यासाठी मौजे आतकोली येथे जागा उपलब्ध करून दिल्यामुळे ठाण्यातील कचरा समस्येवर तोडगा निघाला आहे. त्यामुळे वागळे इस्टेट येथील सी पी टँक या कचरा हस्तांतरण केंद्रात कचरा साठून होणाऱ्या त्रासापासून परिसरातील नागरिकांना लवकरच मोठा दिलासा मिळणार असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

राज्य शासनाने ठाणे महापालिकेस मौजे आतकोली येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जागा हस्तांतरित केली आहे. या जागेचा ताबा ठाणे महापालिकेला प्राप्त झाला असून त्याची हद्द निश्चिती पूर्ण झाली आहे. या जागेवर घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी एकात्मिक प्रकल्प उभारण्यात येत आहे. येथे कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करण्यात येत आहे. त्यामुळे सी पी टँकवरील कचऱ्याचा भार कमी होईल आणि तेथे केवळ शहरातील कचऱ्याचे हस्तांतरण होईल, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

यांत्रिकी पद्धतीने खतनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित होणार

त्याचबरोबर, विकेंद्रित पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी हिरानंदानी इस्टेट, कोलशेत, कौसा, उथळसर येथे यांत्रिकी पद्धतीने खतनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित केले जात आहेत. तसेच, गायमुख येथे महापालिकेच्या जकात नाक्याच्या जागेतही यांत्रिकी पद्धतीने खतनिर्मिती प्रकल्प लवकरच सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे शहरातील कचऱ्याचा भार कोणत्याही एका जागेवर न येता घनकचऱ्याचे सुनियोजित पद्धतीने व्यवस्थापन करणे शक्य होणार असल्याची ग्वाही आयुक्त राव यांनी दिली आहे. (पान २ वर)

नागरिकांची गैरसोय नको –आयुक्तांचे निर्देश

या दरम्यानच्या काळात, सी पी टँक परिसरातील नागरिकांना कचरा साठून होणाऱ्या त्रासापासून दिलासा देण्यासाठी २० ऑगस्टपासून येथे केवळ कचरा हस्तांतरण केंद्र सुरू ठेवावे, कचरा साठवू नये, अशा स्पष्ट सूचना महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिलेल्या आहेत. त्याचबरोबर, परिसरातील स्वच्छता राखणे, घंटा गाड्यांची ये-जा करताना कोणालाही त्रास होणार नाही, वाहतूककोंडी होणार नाही, याची काळजी घ्यावी. नागरिकांची गैरसोय होऊ नये, असे निर्देश आयुक्त राव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

विधानसभेचे बिगुल वाजले !

'या' दिवशी महायुती आणि महाविकास आघाडीचा फुटणार प्रचाराचा नारळ

मुंबई : आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महायुती विरुद्ध महाविकास आघाडीसाठी दोघांनीही दंड थोपटलेले पाहायला मिळत आहेत. महायुतीच्या पाठोपाठ महाविकास आघाडीनेही आता राज्यभर सभा बैठका संवाद यात्रा सुरू करणार आहे. महाविकास आघाडी १६ ऑगस्ट ला प्रचाराचा नारळ फोडणार आहे तर महायुती २० ऑगस्टला आपला प्रचार सुरू करणार आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांकडे महाराष्ट्रसह संपूर्ण देशाच लक्ष लागले आहे. आपली सत्ता कायम ठेवण्यासाठी युतीची धडपड सुरू आहे. तर सत्ताधारी युतीला सत्तेवरून खेचण्यासाठी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रचारात गाजावाजा

महाविकास आघाडी एकही संधी सोडत नाही.जाणून घेऊया सत्ताधारी आणि विरोधकांची नेमकी रणनीती काय आहे? (पान २ वर)

२० ऑगस्टपासून राज्यभरामध्ये संवाद दौरा

तर दुसरीकडे उद्धव ठाकरे हे आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ठाण्यातील बालेकिल्लामध्ये मेळावा घेणार आहे. महाविकास आघाडीच्या वतीने १६ ऑगस्ट पासून प्रचार सभेचा नारळ फोडणार आहे आणि थेट वीस तारखेला प्रचारासाठी राहुल गांधी आणि मलिकार्जुन खर्गे मुंबईत येत आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीने चांगलीच कंबर असलेले आहे. याला प्रतिउत्तर देण्यासाठी महायुती सुद्धा २० ऑगस्टपासून राज्यभरामध्ये संवाद दौरा करत आहे....

मुख्यमंत्री शिंदे यांचा ठाणे–नाशिक महामार्गाचा पाहणी दौरा

मुंबई–नाशिक–मुंबई महामार्गावरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा

रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठीचे लिओ पॉलिमर टेक्नोलॉजी हे तंत्रज्ञान दीर्घकाळ टिकावू असल्याने मुंबई–नाशिक महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. ज्या ज्या ठिकाणी खड्डे पडले आहेत किंवा वाहतूक कोंडी होत आहे, अशा सर्व ठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पाहणी करून हे खड्डे तात्काळ लिओ पॉलिमर टेक्नोलॉजी चा वापर करुन खड्डे बुजविण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.त्याचबरोबर ठाणे–नाशिक महामार्गावरील रस्त्याची प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आज येथे दिले.

महामार्गावरील खड्डे बुजविण्यासाठी लिओ पॉलिमर टेक्नोलॉजीचा वापर उपयुक्त ठरणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज ठाणे– नाशिक महामार्गावरील खारेगाव ते पडघा, तळवली ते शहापूर या रस्त्याची पाहणी केली. या रस्त्यावरील वाहतूक कोंडी होण्याची कारणे पाहण्यासाठी तसेच रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासंदर्भात होत असलेल्या कामांची मुख्यमंत्र्यांनी स्वतः रस्त्यावर उतरून पाहणी केली. त्यावेळी प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते.

कामामध्ये अडथळा आणणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश

ठाणे – यावेळी ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव, एमएमआरडीएचे आयुक्त संजय मुखर्जी, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक तथा उपाध्यक्षअनिल गायकवाड, पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी, वाहतूक उपायुक्त डॉ. विनयकुमार राठोड, महामार्ग सुरक्षा पोलीस अधीक्षक डॉ. मोहन दहिकर, पोलीस उपायुक्त एस.व्ही.शिंदे, रस्ते वाहतूक व महामार्ग मुख्य अभियंता तथा प्रादेशिक अधिकारी अंशुमली श्रीवास्तव, एमएमआरडीए मुख्य अभियंता एस.के.सुरवसे, अधीक्षक अभियंता रमेश किस्ते, भारतीय राजमार्ग प्राधिकरण प्रकल्प संचालक बी.एस.साळुंके, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस. ए. तांबे, कार्यकारी अभियंता सुनिल पाटील, यांच्यासह इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, ठाणे–नाशिक हे जे अंतर आहे (पान २ वर)

प्रकल्पबाधित कुटुंबांच्या घरांसाठी कृती आराखडा तयार करणार

ठाणे – शहरातील विविध प्रकल्पांमुळे बाधित झालेली कुटुंबे वर्षानुवर्षे पुनर्वसन न झाल्याने घरांपासून वंचित आहेत. आमदार संजय केळकर यांच्या पुढाकाराने आयोजित अधिकाऱ्यांच्या बैठकीत प्रशासनाकडून कृती आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे या कुटुंबांना घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यावेळी स्थावर मालमत्ता विभागाची श्वेत पत्रिका काढण्याची मागणीही श्री.केळकर यांनी केली.

स्थावर मालमत्ता विभागाचे उपायुक्त आणि या प्रकल्पाबाधित कुटुंबांची बैठकीत निर्णय

ठाणे शहरात अनेक प्रकल्पांतर्गत शेकडो कुटुंबांची घरे बाधित झाली असून अनेकांचे पुनर्वसन वर्तकनगर, मानपाडा, राबोडी आदी भागात रेंटल इमारतींमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे. तर शेकडो कुटुंबे आजही घरांसाठी वणवण करत आहेत. या कुटुंबांनी अखेर आमदार संजय केळकर यांची भेट घेतली. श्री.केळकर यांनी तातडीने आज शासकीय विश्रामगृहात स्थावर मालमत्ता विभागाचे उपायुक्त मनीष जोशी आणि या कुटुंबांची बैठक घेतली. यावेळी २४ वर्षे घरांपासून वंचित असलेले सॅटीसबाधित ५८ कुटुंबे आणि आठ वर्षांपासून वणवण करणारी हॅप्पी व्हॅली येथील १८ कुटुंबे तसेच माजी नगरसेवक भरत चव्हाण, स्थावर मालमत्ता विभागातील अन्य अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या चर्चेत या कुटुंबांना तातडीने घरे मिळण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे निश्चित करण्यात आले असून त्या दिशेने काम सुरू करण्यात आल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली. या निर्णयामुळे अनेक वर्षे घरांपासून वंचित असलेल्या या कुटुंबांची वणवण संपणार असून या रहिवाशांनी श्री.केळकर यांचे आभार मानले आहेत.

याबाबत आमदार संजय केळकर म्हणाले, शहरात विविध प्रकल्पांसाठी शेकडो कुटुंबांनी त्यांच्या घरांचा त्याग केला आहे. मात्र त्यातील शेकडो कुटुंबे अद्याप योग्य पुनर्वसन न झाल्याने घरांपासून वंचित आहेत. त्यामुळे स्थावर मालमत्ता विभागांतर्गत असलेल्या रेंटल इमारतींमध्ये सद्य स्थितीत किती घरे (पान २ वर)

घोडबंदर टँकरमुक्त करण्यासाठी भातसातून २० एमएलडी पाण्याची तरतुद करा–आ. केळकर

ठाणे – घोडबंदर भागातील वाढती बांधकामे आणि लोकसंख्या यामुळे येथील गृहसंकुलांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असून विविध स्त्रोतांतून अतिरिक्त पाणी पुरवठा या भागाला मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असून लवकरच हा परिसर टँकरमुक्त होईल, असा विश्वास आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला. घोडबंदर परिसरातील पाणी टंचाईग्रस्त गृहसंकुलाचे अनेक प्रतिनिधींनी आज आमदार संजय केळकर यांची (पान २ वर)

अनधिकृत शाळाप्रकरणी अजामीनपात्र गुन्हे दाखल होणार

ठाण्यात विशेषतः दिवा भागात अनधिकृत शाळांचे पेव फुटले असून या प्रकरणी नोटीसा बजावल्या जातात, दंड आकारला जातो, पण पुन्हा या शाळा छुप्या पद्धतीने सुरू राहतात. यात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असून यापुढे या शाळांच्या संचालकांवर अजामिनपात्र गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे शिक्षण मंडळाचे उपायुक्त सचिन पवार यांनी कबूल केले असल्याची माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली.

... लवकरच फेरीवाला धोरण..

फेरीवाला धोरण अंमलात येऊच नये म्हणून काही असामाजिक घटकांचे रॅकेट कार्यरत आहे. मात्र गणेशोत्सवानंतर फेरीवाला समितीच्या निवडणुका होऊन हे धोरण लवकरच अमलात येईल, अशी माहिती आमदार संजय केळकर यांनी दिली.

जागतिक आदिवासी दिन...

(छाया, मनोज सिंह)

जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून ठाणे येथील आदिवासी श्रमिक संघर्ष संघटना व ठाणे परिसरातील गावपाड्यात राहणाऱ्या आदिवासींच्यावतीने ठाणे शहरात भव्य मोटार सायकल रॅली, शोभा यात्रेचे आयोजन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हंसराज खेवरा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या रॅलीत आमची संस्कृती, आमचा अभिमान, मी आदिवासी, माझा स्वाभिमान' अशी परंपरा असलेला आदिवासी समाज बांधवाच्या जीवन पद्धती, चालीरीती, रुढी परंपरा, वादन, गीते, कला यांचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीत तरुण–तरुणींनी– विद्यार्थ्यांनी नृत्य करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. या समाजातील समस्त स्थानिक आदिवासी भूमिपुत्र महिला– पुरुष, मंडळी मोठ्या संख्येने आपल्या पारंपरिक पोशाख परिधान करून मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते, (पान २ वर)

लोकसभा निवडणुकीत १ लाख ६६ हजार ९१० बोगस मतदान

पुराव्यासह तक्रारी करून देखील आयोग गंभीर नाही

- निवडणूक आयोग म्हणजे सत्ताधाऱ्यांची खाजगी यंत्रणा – शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे
- लोकसभा निवडणुकीत निवडणुक अधिकाऱ्यांनी सत्ताधाऱ्यांच्या दबावापोटी काम केले
- बोगस मतदारांना रोखण्यात निवडणूक आयोगाला अपयश

ठाणे – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी खासदार राजन विचारे यांनी लोकसभेच्या पराभवानंतर आपल्या पराभवाची कारणे शोधली असल्यास त्यावेळी असे निदर्शनास आले की जनमत आपल्या बाजूने असताना पैसा व सत्तेचा वापर करून निवडणूक यंत्रणांमध्ये आपल्या जवळच्या अधिकारांच्या नेमणुकांकरून सत्ताधारी आपली पोळी भाजून घेत असल्याचा गंभीर आरोप विचारे यांनी ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडे आयोजित केलेल्या बैठकीत केला आहे त्यावेळी जिल्हाधिकारी व सर्व निवडणूक अधिकारी वर्ग तसेच ठाणे ,नवी मुंबई, मिरा-भाईंदर शहराचे जिल्हाप्रमुख तसेच शहर प्रमुख व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते केला आहे.

बोगस मतदानाला प्रोत्साहन देऊ नका दोषीवर कार्यवाही करा

नुकताच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणात झालेल्या बोगस मतदानाला आळा बसावा यासाठी येणाऱ्या विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे यांनी दिनांक १९/ ०७/ २०२४ रोजी निवडणूक आयोग व निवडणूक अधिकारी ठाणे यांना दिलेल्या पत्रामध्ये ठाणे लोकसभा मतदार संघातील विधानसभासहित १४५,१४६, १४७, १४८ , १५० व १५१ विधानसभा मतदार यादीतील दुबार नावांची आकडेवारी व या दुबार मतदारांनी दोन ते तीन वेळा केलेल्या मतदाराची आकडेवारी पुरावे सहीत दिलेली आहे ती दुबार नावे वगळावी अशी मागणी करण्यात आली आहे तसेच एखाद्या यादीमधील अपरिचित व्यक्ती जी कोणी तेथे राहत नसतील तर त्यांना नोटीसा पाठवून त्यांचे नाव कोणत्या यादीमध्ये ठेवावे किंवा ठेवू नये यावर तातडीने कार्यवाही करावी अशी ही मागणी नुकताच दिलेल्या पत्रामध्ये म्हटले आहे तसेच दिनांक ६ ऑगस्ट २०२४ रोजी प्रारूप प्रसिद्ध केलेली यादी ची फोटो सहित सॉफ्ट कॉपी दिल्यास यातील पुन्हा दुबार नावे शोधण्यास BLA यांना सोपे जाईल तसेच वगळण्यात येणारी नावे पुन्हा नोदाविण्यास मदत करणाऱ्या दोषीवर कार्यवाही करा अशी मागणी करण्यात आली आहे.

दिनांक १८/०७/ २०२४ रोजी दिलेल्या पत्रातील मुद्दे

१) दिनांक २० मे २०२४ रोजी झालेल्या मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर अधिकाऱ्यांकडून १७ सी अर्जावर नमूद केलेले मतदारांची संख्या व ४ जून २०२४ रोजी निकालानंतर फॉर्म नंबर २० वर केलेल्या मतदारांची संख्या यामध्ये तफावत असल्याचे भासून आल्याने याचे स्पष्टीकरण द्यावे.

२) मतदान केंद्रांवर ईव्हीएम मशीनच्या POLL .END. TIME. मध्ये दाखवण्यात आलेला टाईम हा एउख च्या निदर्शनाप्रमाणे संध्याकाळी सहा पर्यंत असणे आवश्यक असताना मशीन्स वेळेच्या आधी बंद झालेल्या आढळून आले आहेत. याचे स्पष्टीकरण द्यावे.

३) या EVM मशीन १२ तास वापरून सुद्धा ९९% दाखवत होत्या याचे स्पष्टीकरण द्यावे.

४) मिरा-भाईंदर मधील ईव्हीएम द्वारे मतमोजणी झालेली आकडेवारी ही व्हीव्हीपॅट स्लीप यात तफावत आढळल्याचे निदर्शनास आले आहे याचे स्पष्टीकरण द्यावे.

वरील उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे स्पष्टीकरणासाठी अधिकृत पुरावे निवडणूक विभागाकडे असल्याने याची पडताळणी करून त्यांनीच याचे स्पष्टीकरण देऊन शंका दूर करावी अशी मागणी भारत निवडणूक आयोग व ठाणे निवडणूक अधिकाऱ्याकडे करण्यात आली आहे परंतु याची दखल घेतली जात नसल्याने खासदार राजन विचारे यांनी सरकारी यंत्रणेवर ताशेरे ओढले आहेत

...तर रस्त्यावर उतरून काम करावे लागेल

सरकार हे बदलत असतात कोणी कायमस्वरूपी नसतात. ज्या पद्धतीने अधिकाऱ्यांकडून कार्यकर्त्यांसारखी काम करून घेतली जात आहेत. लोकसभेला आम्ही सहन केले,विधानसभेला सहन केले जाणार नाही. तसेच कोणी कामे केलेली आहेत या सर्व लोकांची नावे आमच्याकडे आहेत वेळ आल्यास नक्की जाहीर करू, जर अशा पद्धतीने लोकशाहीचा गळा घोटत असाल तर रस्त्यावर उतरून काम करावे लागेल असाच इशारा शिवसेना नेते माजी खासदार राजन विचारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे

भारत निवडणूक आयोग वारंवार असे सांगते की निवडणूक प्रक्रिया सपूर्ण पारदर्शकता आहे परंतु या मध्ये अपारदर्शकता असल्याने ठाणे लोकसभेचे माजी खासदार यांनी मुख्य निवडणूक आयुक्त दिल्ली , मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य तसेच निवडणूक निर्णय अधिकारी ठाणे जिल्हाधिकारी यांना दिनांक १८/०७/ २०२४ व १९/ ०७/ २०२४ पत्राद्वारे लोकसभा निवडणूक प्रक्रियेतील झालेल्या अपारदर्शकता संदर्भात पत्र दिले आहे परंतु अद्यापही याचे लेखी उत्तर प्राप्त न झाल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या शिष्टमंडळाने निवडणुकी संदर्भात पुन्हा स्मरण पत्र देऊन पत्रामध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीचा खुलासा सादर करावा असे मागणी पुन्हा केली आहे.

संपादकीय...

संपादक-चंद्रकांत भोईटे

अशांततेचे देश

अमेरिकेने नुकतीच एक नवीन ट्रॅव्हल डव्हायझरी जारी केली आहे. ज्यामध्ये अमेरिकन नागरिकांना बांगलादेशसह अनेक देशांमध्ये प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. सुरक्षेचे कारण आणि जागतिक घडामोडी लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. विशेष म्हणजे या डव्हायझरीमध्ये भारतामध्ये प्रवास न करण्याचा सल्लाही अमेरिकेने त्यांच्या देशातील प्रवाश्याना दिला आहे. जगात अनेक देशांत अशांतता व अस्थैर्य निर्माण झाले आहे. त्यामुळे अशा देशांत गेल्यास अरिष्टाला सामोरे जावे लागेल असा इशाराही पर्यटकांना देण्यात आला आहे.अमेरिकेने आपल्या देशातील नागरिकांना बांगलादेशात न जाण्याचा सल्ला दिला आहे. यासोबतच अमेरिकन नागरिकांना संकट काळात मदत करणाऱ्या त्यांच्या सरकारी कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही तात्काळ देश सोडण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून बांगलादेशात आरक्षणविरोधी हिंसक आंदोलने आणि संघर्ष सुरू आहेत, ज्यात आतापर्यंत ४०० हून अधिक लोक मारले गेले आहेत. बांगलादेशात सध्या अस्थिर परिस्थिती आहे. अमेरिकेने त्यांच्या देशातील नागरिकांना व्हेनेझुएलामध्ये न जाण्याचा सल्ला दिला आहे. कॅरेबियन देश व्हेनेझुएलामधील नागरी अशांतता, हुकूमशाही, दहशतवादी धमक्या आणि अमेरिकाविरोधी भावना लक्षात घेऊन अमेरिकेने तेथे प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. गुन्हेगारी आणि अपहरणाच्या घटनांमुळे युनायटेड स्टेट्सने मेक्सिकोच्या काही भागांमध्ये – कोलिमा, ग्युरेरो, मिचोआकान, सिनालोआ, तामौलीपास आणि झकाटेकास – प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. रशिया आणि युक्रेनमधील युद्धादरम्यान अमेरिकेने आपल्या नागरिकांसाठी अलर्ट जारी केला होता. सध्या रशियात असलेल्या कोणत्याही अमेरिकन नागरिकांनी तात्काळ देश सोडावा, असे अमेरिकेने म्हटले होते. त्याचबरोबर जे नागरिक रशियाला जाण्याचा विचार करत आहेत, त्यांनाही तिथले प्रवासाचे बेत रद्द करण्याचा सल्ला देण्यात आला होता. रशियाचा शेजारी आणि मित्र बेलारूसमध्येही अमेरिकेने आपल्या नागरिकांना प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. युक्रेन आणि रशिया यांच्यातील युद्धानंतर अमेरिकेने आपल्या नागरिकांना प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. दहशतवाद, नागरी अशांतता, अपहरण किंवा ओलीस ठेवणे आणि सशस्त्र संघर्षाच्या जोखमीमुळे अमेरिकन नागरिकांना सीरियामध्ये प्रवास न करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. चुकीच्या पद्धतीने ताब्यात घेतल्याच्या धोक्यामुळे अमेरिकेने आपल्या नागरिकांना अधिक सावधगिरी बाळगण्यास सांगितले आहे. दहशतवाद, नागरी अशांतता, अपहरण आणि अमेरिकन नागरिकांच्या होत असलेल्या मनमानी अटकेच्या जोखमीमुळे अमेरिकेने आपल्या नागरिकांना इराणमध्ये प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धादरम्यान अमेरिकेने आपल्या नागरिकांना इराकमध्ये न जाण्याचा सल्ला दिला होता. त्याच वेळी, दहशतवाद, अपहरण, सशस्त्र संघर्ष, नागरी अशांतता आणि अमेरिकन नागरिकांना मदत करण्यासाठी मिशन इराकची मर्यादित क्षमता यामुळे इराकमध्ये प्रवास न करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दहशतवाद, चुकीच्या पद्धतीने ताब्यात घेण्याचा धोका, नागरी अशांतता, अपहरण आणि गुन्हेगारीमुळे अमेरिकेने आपल्या नागरिकांना अफगाणिस्तानात प्रवास करण्यास मनाई केली आहे. अमेरिकेने आपल्या नागरिकांना दहशतवाद, नागरी अशांतता, गुन्हेगारी, आरोग्य धोके, अपहरण, सशस्त्र संघर्ष आणि भूसुरुंगांमुळे येमेनमध्ये प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. उत्तर कोरियात अमेरिकन नागरिकांना अटक होण्याचा आणि दीर्घकालीन ताब्यात ठेवण्याचा गंभीर धोका आहे. यामुळेच अमेरिकेने आपल्या नागरिकांना येथे प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. दहशतवाद आणि सशस्त्र संघर्षामुळे अमेरिकेने आपल्या नागरिकांना गाझामध्ये न जाण्याचा सल्ला दिला आहे. हिजबुल्लाह आणि इस्रायलमधील वाढत्या तणावामुळे अमेरिकेने आपल्या नागरिकांना उत्तर इस्रायल, लेबनीज आणि सीरियाच्या सीमेच्या अडीच मैलांच्या आत प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. अमेरिकेने आपल्या नागरिकांना भारतातील मणिपूर, जम्मू-काश्मीर, भारत-पाकिस्तान सीमा आणि देशाच्या मध्य आणि पूर्व भागात प्रवास न करण्याचा सल्ला दिला आहे. दहशतवाद आणि नागरी अशांततेमुळे या भागात प्रवास करू नका, असे अमेरिकेने आपल्या ट्रॅव्हल डव्हायझरीमध्ये म्हटले आहे. सध्या जगातील अनेक देशांतील विविध भागांत अशांतता निर्माण झाली असून त्यात भारताचाही समावेश अमेरिकेने केला आहे ही चिंताजनक बाब आहे. भारत सरकारने यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

विधानसभेचे बिगुल वाजले

(पान १ वरून) ■ **महाविकास आघाडीची नेमकी काय रणनिती आहे? –** विधानसभेच्या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची पहिली सभा मुंबईमध्ये १६ ऑगस्टला षण्मुखानंद हॉलमध्ये पार पडणार आहे. या सभेला शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले आणि महाविकास आघाडीचे सर्व महत्त्वाचे नेते आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत आगामी विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराच रणशिंग याच सभेतून महाविकास आघाडी फुकंणार आहे. त्यानंतर २० ऑगस्टला काँग्रेसचे नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत बीकेसीत सभा पार पडणार आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाची शिवनेरीवरून आज पासून शिवस्वराज्य यात्रेची सुरुवात झालेली आहे. तर उद्यापासून काँग्रेस पक्षाचे नेते मराठवाड्याच्या दौऱ्यावरती असून प्रभारी रमेश चन्नीथला हेही उपस्थित असणार आहेत. मराठवाड्यातील जागा वाटपांच्या चाचणीसह प्रचारांच्या छोट्या-मोठ्या सभा पार पडणार आहेत.

■ **काय आहे महायुतीची रणनीती? –** प्रचाराची रणनीती ठरवण्यासाठी रात्री उशिरा मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री आणि समन्वय समितीच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. २० ऑगस्टला कोल्हापूरमध्ये महालक्ष्मीचे दर्शन घेऊन महायुती संवाद यात्रेला सुरुवात करणार आहेत. महायुतीचे २८८ मतदार संघामध्ये ही संवाद यात्रा होणार आहे. कोल्हापूरमध्ये सुरुवात केलेल्या संवाद यात्रेची सांगता मुंबईमध्ये होणार आहे.

एका दिवसाला दोन किंवा तीन मतदारसंघांमध्ये ही संवाद यात्रा होईल. या संवाद यात्रेचा दौरा कमीत कमी सात दिवस आणि जास्तीत जास्त दहा दिवसांचा असणार आहे. राज्याच्या सातही विभागामध्ये मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जाहीर सभा होणार आहे.

■ **मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रचारात गाजावाजा –** महायुतीच्या प्रचारामध्ये सर्वात महत्त्वाचा मुद्दा असेल तो मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण हा असणार आहे आणि याच मुख्यमंत्री लाडके बहीण योजनेच्या पहिला हप्ता १७ ऑगस्टला दिला जाणार आहे. त्यासाठी मुख्यमंत्री दोनही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत मोठा गाजावाजा करत कार्यक्रम घेतला जाईल आणि त्यावेळी प्रत्येक जिल्ह्यामध्ये पालकमंत्री ही हा कार्यक्रम घेणार आहेत. त्यामुळे ख-या अर्थाने महायुतीच्या प्रचाराला सुरुवात या ठिकाणाहून होणार आहे.

■ **कोण बाजी मारणार? –** महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या प्रचाराच्या रणनीती ठरलेल्या आपल्याला पाहायला मिळतायेत. मात्र प्रश्न उरलाय तो जागा वाटपांचा आणि प्रचारासोबतच जागा वाटपाला सुद्धा युती आणि महाविकास आघाडीमध्ये सुरुवात झालेली आहे. जागा वाटप करताना अनेक जागांवर तिढा आहे. कारण युती आणि आघाडीत नवीन भिडू पहिल्यांदा सहभागी झालेले आहेत. त्यामुळे जागावाटप करताना दोघांनाही डोकेदुखी तर असणारच आहे मात्र रुसवे फुगवे ही यामध्ये मोठ्या प्रमाणावरती पाहायला मिळणार आहे. यात कोण बाजी मारणार आणि कोण आपल्या पदरात जास्त जागा पाडून घेणार हे पाहणं महत्वाचं राहणार आहे.

डंम्पिंग ग्राऊंड बंद करा-ठाण्यात भाजप, शिवसेना उबाठा गटाचे निदर्शने

(पान १ वरून) त्यामुळे येथे मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूककोंडी देखील होते. शिवाय उघड्यावरती ही कचऱ्याची वाहतूक केली जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावरती रस्त्यावर या संपूर्ण परिसरामध्ये कचऱ्याचा खच पडलेला दिसतो. अनेकदा उघड्यावरती कचऱ्याची वाहतूक केली जात असल्यामुळे दुर्गंधीचा सामना देखील परिसरातील नागरिकांना सहन करावा लागतो त्यामुळे स्थानिक आणि हे डम्पिंग येथून हटवण्याची मागणी केली होती. याबाबत अनेकदा आंदोलने देखील करण्यात आलेले होते. याप्रसंगी ठाणे महानगरपालिका प्रशासनाने डम्पिंग हटवण्याबाबत कागदावरती आश्वासन दिलं होतं, मात्र प्रत्यक्षात हे डम्पिंग येथे सुरू असल्याने काल भारतीय जनता पार्टीच्या सचिव रजनीश त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली हे आंदोलन केले. यावेळी विजय नाडा, सुरेश कांबळे यांसह विविध पदाधिकरी येथे उपस्थित होते. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी देखील येथे आंदोलन केले.

मुंबई-नाशिक-मुंबई महामार्गावरील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा

(पान १ वरून) ते पार करण्यासाठी सध्या नेहमीपेक्षा जास्त वेळ लागत आहे. या मार्गावरील खड्ड्यांमुळे तसेच येथील अवजड वाहनांच्या वर्दळीमुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरण, एमएमआरडीए, पोलीस या संबंधित विभागांची बैठक घेऊन यामध्ये अवजड वाहने आहेत त्यांना पार्किंग लॉट मध्ये पार्क केल्यानंतर वाहतूक सुरु करण्यात यावी. जेव्हा ट्रॉफिक कमी होईल तेव्हा अवजड वाहने सोडण्यात येतील, अशा प्रकारचे नियोजन करण्यात आले आहे. त्याचप्रकारे जेएनपीटी येथून येणाऱ्या वाहनांसंबंधी रायगड, ठाणे व पालघर या तीनही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षक यांना या वाहनांसंबंधी आवश्यक ते नियोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ते म्हणाले, समन्वयाने वाहतुकीचे नियमन होईल याकडे लक्ष देण्याच्या सूचना दिल्या आहेत. पावसाळ्यात पडलेल्या खड्ड्यांमध्ये कुठल्याही प्रकारचे बांधकाम साहित्य टिकत नाही. त्यामुळे हे खड्डे बुजविण्यासाठी एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लिमिटेड च्या अभियंत्यांनी शोध लावलेल्या लिओ पॉलिमर टेक्नोलॉजी या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये फायबर आहे. यावरुन अवजड वाहनेसुध्दा जावू शकतात. या तंत्रज्ञानाचा वापर करुन या महामार्गावरील मोठे मोठे पॅच भरुन काढण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे. ठाणे-नाशिक व नाशिक-ठाणे या संपूर्ण रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम या तंत्रज्ञानानेच करण्यात येणार आहे. ही पध्दत टिकावू आहे. त्यामुळे लोकांना प्रवासात खड्ड्यांचा त्रास होणार नाही.

मुख्यमंत्री महोदयांनी एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड चे सुहास मेहता व त्यांच्या टिमचे यावेळी आभार मानले. या कामामध्ये अडथळा आणणाऱ्यांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी, असे संबधितांना निर्देश देवून ते पुढे म्हणाले की, हा लाखो प्रवाशांचा विषय आहे. हा कोणाचा रस्ता आहे, कोण बनवतय, हे काम कोण करीत आहे, हे महत्वाचे नसून सर्वांनी टिम बनून हे काम पूर्ण करायचे आहे. नवीन टेक्नॉलॉजीचा उपयोग करुन लोकांना सुलभ प्रवास करण्यासाठी सहकार्य करायचे आहे. जिंदाल, वाशिंद, आसनगाव रेल्वेपूल या सर्व पूलांवर या पध्दतीचा वापर करणार आहोत. भिवंडी आणि माणकोली मार्गावरील खड्डेही भरण्यात येणार आहेत. भविष्यात खडवली फाटा येथे पूल तयार होणार आहे, त्यामुळे येथील वाहतूक कोंडीदेखील कमी होईल. मनुष्यबळ आणि यांत्रिक सामुग्री यांचा जास्तीत जास्त वापर करुन हे रस्ते लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना संबंधितांना दिल्या आहेत.

वागळे इस्टेट सी पी टँक परिसरातील नागरिकांना मिळणार दिलासा

(पान १ वरून) ठाणे महापालिका क्षेत्रातील घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी दिवा येथील क्षेपणभूमीचा वापर करण्यात येत होता. या क्षेपणभूमीची क्षमता जानेवारी २०२३मध्ये संपुष्टात आली. त्यानंतर, डायघर येथे ऑक्टोबर २०२३ मध्ये पूर्व प्रक्रिया केंद्र सुरू करण्यात आले. मात्र त्या प्रकल्पात काही तांत्रिक बदल करावे लागल्याने हा प्रकल्प तुर्तास बंद आहे. हा प्रकल्प लवकरच सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान, भांडार्ली येथे सुरू करण्यात आलेल्या क्षेपणभूमीची क्षमताही मर्यादित आहे. त्यामुळे, वागळे इस्टेटमधील सी पी टँक येथील हस्तांतरण केंद्रात कचऱ्याची आवक वाढली. हा पर्याय हाताशी असल्याने ठाणे महापालिका क्षेत्रातील कचऱ्याच्या हाताळणीची व्यवस्था उपलब्ध आहे. अन्यथा, महापालिका क्षेत्रात कचऱ्याची मोठी समस्या उद्भवू शकते.

ठाणे महापालिका क्षेत्रातील घनकचऱ्याची शास्त्रोक्त विल्हेवाट लावण्यासाठी नवीन जागेची निकड निर्माण झाल्याने राज्य शासनाकडे जागेची मागणी नोंदवण्यात आली होती. त्यास मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यातून मौजे आतकोली येथील जागा घनकचरा व्यवस्थापनासाठी उपलब्ध झाली आहे. या जागेवर कचऱ्याचे शास्त्रोक्त व्यवस्थापन होऊ लागल्याने ठाणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे.

प्रकल्पबाधित कुटुंबांच्या घरांसाठी कृती आराखडा तयार करणार

(पान १ वरून) लाभार्थ्यांना दिली आहेत, किती घरे रिकामी आहेत, किती घरांमध्ये बोगस लाभार्थी आहेत, याची माहिती देणारी श्वेतपत्रिका महापालिकेने काढावी, अशी मागणी मी केली आहे. बोगस लाभार्थ्यांमुळे पात्र लाभार्थ्यांना पत्रही नाही आणि घरेही मिळत नसल्याने त्यांच्यावर अन्याय होत आहे. जोपर्यंत त्यांना घरे मिळत नाहीत, तोपर्यंत मी त्यांच्या पाठीशी ठाम उभ्या राहणार असून हा प्रश्न तडीस नेल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असे केळकर म्हणाले.

घोडबंदर टँकरमुक्त करण्यासाठी भातसातून २० एमएलडी पाण्याची तरतुद करा-आ. केळकर

(पान १ वरून) महापालिका मुख्यालयातील भाजपा गटनेते कार्यालयात भेट घेतली. यावेळी ठामपा पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद पवार हे देखील उपस्थित होते.

घोडबंदर वासियांना होणारा अपुरा पाणीपुरवठा आणि वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत कमी पडत असलेली पाणी वितरण व्यवस्था यांच्याबाबत दीर्घकालीन उपाययोजना म्हणुन भातसा धरणातून २० एमएलडी पाण्याची तरतुद करावी. अशी सुचना आमदार संजय केळकर यांनी ठाणे महापालिकेला केली. यावर प्रशासनाने सहमती दर्शविली असल्याची माहिती श्री. केळकर यांनी दिली. सुर्या धरणाचे पाणी मीरा-भाईंदर महापालिकेला मिळत आहे, त्या पार्श्वभूमीवर ठाणे महापालिकेलाही पाणी मिळावे यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे केळकर यांनी सांगितले.

माजीवड्यापासून उर्वरित घोडबंदर पट्ट्यात पाण्याच्या टाक्या आहेत, पण पुरेसा पाणी पुरवठा नसल्याने स्थानिक रहिवाशांना पुरेसे पाणी मिळत नाही. अमृत योजनेमधून पाण्याचे समतोल वितरण व्हावे यासाठी आता जलकुंभ उभारण्यात येत आहे. त्यामुळे समान पाणी वाटप होऊ शकेल, असेही केळकर यांनी सांगितले. स्टेमकडून अतिरिक्त पाणी मिळावे यासाठी देखील पाठपुरावा सुरू आहे. त्यामुळे घोडबंदर परिसर लवकरच टँकरमुक्त होईल, असा विश्वास आमदार संजय केळकर यांनी व्यक्त केला.

जागतिक आदिवासी दिन...

(पान १ वरून) समाज बांधवांनी क्रांतिसूर्य विर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व समाज बांधवांनी मोठ्या उत्साहात आज जागतिक आदिवासी दिवस साजरा केला. या प्रसंगी मान्यवरांनी आदिवासी लोकांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्यासाठी व त्यांच्या विकासाला चालना देण्यासाठी आज एक महत्त्वाचा दिवस आहे. आदिवासी समाजाच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करून त्यांच्या विकासात्मक पावले उचलणार असे आदिवासी श्रमिक संघर्ष संघटना ठाणे अध्यक्ष हंसराज खेवरा यांनी सांगितले.

पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. ०२२-२७४५२२३३ Email: panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.३५३/३५४/२०२४ दिनांक :- ०९/०८/२०२४

जाहिर सुचना

उप आयुक्त (उद्यान विभाग), पनवेल महानगरपालिकेच्या विविध उद्यानांचा विकास करणेसाठी नवनवीन साधने उपलब्ध करून देणेबाबत आवश्यक बाबीकरीता दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर कामाचा तांत्रिक तपशील व इतर बाबी www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर दि. १०/०८/२०२४ दि. १९/०८/२०२४ पर्यंत सकाळी ११.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदर कामाची बाजारभाव दरपत्रके दि. १०/०८/२०२४ ते दि. १९/०८/२०२४ पर्यंत सकाळी ११.०० वाजेपर्यंत उद्यान विभागात स्वीकारण्यात येतील.

जा. क्र. पमपा/उद्यान/५५२४/प्र. क्र.०२/२७१/२०२४
दि. ०९/०८/२०२४

सही/-
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
परिवहन उपक्रम
नामदार जगन्नाथ नाना शंकरशेट बस डेपो, आर.टी.ओ कॅम्प कार्यालयाजवळ,
स्वातंत्र सैनिक यशवंत शंकर म्हात्रे मार्ग, घोडबंदर, ता. जि. ठाणे ४०११०७

जा.क्र.मनपा/परि/ १६९ / २०२४-२५ दिनांक :-०९/०८/२०२४

// प्रथम मुदतवाढ //

मिरा-भाईंदर महानगपालिका क्षेत्रात बांधण्यात आलेल्या उर्वरित ५७ बस थांब्यावर 'जसे आहे तसे' तत्वावर देवून देखभाल दुरुस्तीसह जाहिरातीचे हक्क प्रदान करणेकामी दि. ३०/०७/२०२४ रोजी कोकण सकाळ, मुंबई तरुण भारत व दै. महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करून Tender ID 2024_MBMC_1061416_1 अन्वये ऑनलाईन निविदा स्विकारण्यासाठी दि. ०८/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० पर्यंत मुदत देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा स्विकारण्याची मुदत वाढवून दि. १०/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत करण्यात येत आहे. सदर कामी प्राप्त निविदा दि. २१/०८/२०२४ रोजी सायं. ५.०० वाजता उघडण्यात येतील.

इतर मजकुरात बदल नाही.
जा. क्र. मनपा/मावज/E-२५५६२१२/२०२४-२५
दि. ०९/०८/२०२४

सही/-
(अनिकेत मानोरकर)
अति. आयुक्त तथा
परिवहन व्यवस्थापक
मिरा भाईंदर महानगरपालिका

रेपो दर ६.५ टक्क्यांवर ठेवण्याच्या RBI च्या निर्णयाला ठाण्यातील रिअल इस्टेट सकारात्मक : जितेंद्र मेहता

ठाणे : रेपो रेट ६.५ टक्क्यांच्या पातळीवर ठेवण्याच्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाला ठाण्यातील रिअल इस्टेटने सकारात्मक प्रतिसाद दिला, असे क्रेडाई एमसीएचआय ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी सांगितले. तसेच, ठाण्यातील रिअल इस्टेट उद्योग दर स्थिरता सुनिश्चित करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचे आम्ही कौतुक करतो, यामुळे रिअल इस्टेट आणि पायाभूत सुविधांमध्ये वाढ राखण्यास मदत होईल, ते म्हणाले.

CREDAI MCHI ठाणेला अपेक्षा आहे की, या निर्णयामुळे गृहनिर्माण बाजारातील मागणी वाढेल, विशेषत: मिड-सेगमेंट श्रेणीतील, ठाण्याच्या रिअल इस्टेटच्या एकूण वाढ आणि विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. ठाण्यातील रिअल इस्टेटमध्ये परवडणाऱ्या लक्झरी विभागात सातत्याने वाढ होत आहे आणि सध्याच्या दरातील स्थिरतेमुळे ही गती कायम राहण्यास मदत झाली पाहिजे. गृहखरेदीदारांना अनुकूल कर्जदरांचा फायदा होत राहील, ज्यामुळे गृहनिर्माण बाजारपेठेत अधिक गुंतवणुकीला प्रोत्साहन मिळेल, ते पुढे म्हणाले.

आम्ही धोरणातील संतुलित दृष्टिकोनाचे स्वागत करतो, जे चलनवाढीचा समतोल राखताना तरलता राखते आणि वित्तीय संस्थांना समर्थन देते. उठएऊ-ख चउक्ख ठाणे देखील सरकारकडे पुढील सहाय्यक उपायांवर विचार करण्यास उत्सुक आहे ज्यामुळे तरलता वाढेल आणि क्षेत्राला दीर्घकालीन स्थिरता मिळेल, त्यांनी असा निष्कर्ष काढला.

भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार – २ नायब सुभेदार –
■ क्रीडा पात्रता: ऍथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:– (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण
■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४
■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

मध्य रेल्वे

■ जागा : २४२४
■ पदाचे नाव: अप्रेंटिस
मुंबई
भुसावळ
पुणे
नागपूर
सोलापूर
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये NCVT (Fitter/Welder / Carpenter/ Painter/Tailor/Electrician/ Mechanist / PASAA / Mechanical Diesel / Lab Assistant/Turner/ Electronics Mechanic/Sheet Metal Worker / Winder / MMTM/Tool Die Maker/Mechanical Motor Vehicle/IT Electronic System Maintenance)
■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: मध्य रेल्वे
■ Fee: General/OBC: 100/- SC/ ST/PWD/EWS/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://cr.indianrailways.gov.in/

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ ट्रॉपिकल मेट्रोलॉजी

■ जागा : ३०
■ पदाचे नाव :
MRFP रिसर्च फेलो
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी (M.Sc./ M.Tech) SC/ ST/PwBD:50% JwU (ii) NET/GATE/LS (CSIR/UGC/IC-R).
■ वयाची अट:
१० ऑगस्ट २०२४ रोजी २८ वर्षांपर्यंत
SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: पुणे
■ फी : फी नाही.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख:
१० ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://www.tropmet.res.in/

होमगार्ड भरती २०२४

■ जागा : ९०००
पदाचे नाव :
१ होमगार्ड
■ जिल्हानिहाय रिक्त पदे:
अ.क्र. जिल्हा पद संख्या
१ सातारा ४९५
२ नांदेड ३२५
३ रत्नागिरी ४५८
४ जळगाव ३२५
५ चंद्रपूर ८२
६ यवतमाळ १२१
७ सिंधुदुर्ग १७७
८ धुळे १३८
९ हिंगोली ७५
१० अमरावती १४१
११ बीड २३४
१२ धाराशिव २३७
१३ वाशिम ५९
१४ भंडारा ३१
१५ नंदुरबार ७९
१६ गडचिरोली १४१
१७ रायगड ३१३
१८ लातूर १४३
१९ पुणे १८००
२० सांगली ६३२
२१ नाशिक १३०
२२ कोल्हापूर २८७
२३ वर्धा ७६
२४ छ. संभाजीनगर ४६६
२५ नागपूर ८९२
२६ जालना १९५
२७ अकोला १५१
२८ अहमदनगर ३५९
२९ बुलढाणा २४८
३० बृहन्मुंबई –
■ शैक्षणिक पात्रता: किमान १०वी उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता:
उंची छाती धावणे
पुरुष १६२ से.मी. ७६ सेमी व फुगवून ५ सेमी जास्त १६०० मीटर
महिला १५० से.मी. – ८०० मीटर
■ वयाची अट: २० ते ५० वर्षे.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : फी नाही.
■ महत्त्वाच्या तारखा:
अ. क्र. जिल्हा Online अर्ज करण्याची शेवटची तारीख
१ सातारा ३१ जुलै २०२४
२ नांदेड १४ ऑगस्ट २०२४
३ रत्नागिरी १४ ऑगस्ट २०२४
४ जळगाव १४ ऑगस्ट २०२४
५ चंद्रपूर १० ऑगस्ट २०२४
६ यवतमाळ १७ ऑगस्ट २०२४
७ सिंधुदुर्ग १४ ऑगस्ट २०२४
८ धुळे १४ ऑगस्ट २०२४
९ हिंगोली १४ ऑगस्ट २०२४
१० अमरावती ०५ ऑगस्ट २०२४
११ बीड १६ ऑगस्ट २०२४
१२ धाराशिव १४ ऑगस्ट २०२४
१३ वाशिम १४ ऑगस्ट २०२४
१४ भंडारा १६ ऑगस्ट २०२४
१५ नंदुरबार १४ ऑगस्ट २०२४
१६ गडचिरोली १४ ऑगस्ट २०२४
१७ रायगड १६ ऑगस्ट २०२४
१८ लातूर १६ ऑगस्ट २०२४
१९ पुणे ११ ऑगस्ट २०२४
२० सांगली १४ ऑगस्ट २०२४
२१ नाशिक १४ ऑगस्ट २०२४
२२ कोल्हापूर १४ ऑगस्ट २०२४
२३ वर्धा १५ ऑगस्ट २०२४
२४ छ. संभाजीनगर १४ ऑगस्ट २०२४
२५ नागपूर २४ ऑगस्ट २०२४
२६ जालना १७ ऑगस्ट २०२४
२७ अकोला १७ ऑगस्ट २०२४
२८ अहमदनगर १७ ऑगस्ट २०२४
२९ बुलढाणा १७ ऑगस्ट २०२४
३० बृहन्मुंबई १४ ऑगस्ट २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php

महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४
■ जागा : २८९
■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■ फी : खुला प्रवर्ग: १०००/– मागासवर्गीय: ९००/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

सभासद व्हा ....आणि
दररोज नोकऱ्यांची माहिती आपल्या मोबाईलवर थेट मिळवा
वार्षिक वर्गणी फक्त 450/-
संपर्क : 9892305888

पश्चिम–मध्य रेल्वे

जागा : ३३१७ जागा
■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)
■ शैक्षणिक पात्रता:
मेडिकल लॅब टेक्निशियन: (i) १२वी उत्तीर्ण (Physics, Chemistry Biology) (ii) NCVT/SCVT.
उर्वरित ट्रेड: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI
■ वयाची अट: ०५ ऑगस्ट २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: पश्चिम–मध्य रेल्वे
■ Fee: General/OBC:141/- SC/ ST/PWD/महिला: ४१/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट https://wcr.indianrailways.gov.in/

भारतीय रेल्वे

भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१
■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)
■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ExSM²/ट्रान्सजेंडर/ EBC/महिला: २५०/–
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४
■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर
■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची ज्येष्ठ नागरिकांची इच्छा शासन करणार पूर्ण मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना

राज्यातील सर्वधर्मीय ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांची तीर्थक्षेत्रांना भेट देण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत प्रति व्यक्ती ३० हजार रुपये इतके अनुदान प्रवास खर्चासाठी देण्यात येणार आहे. अधिक जाणून घेवू या. 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन' योजनेविषयी..

या योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य व भारत देशातील प्रमुख तीर्थस्थळांचा समावेश या योजनेंतर्गत निर्धारित तीर्थस्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल. प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रति व्यक्ती ३० हजार रुपये इतकी राहील. यामध्ये प्रत्यक्ष प्रवास, भोजन, निवास इ.सर्व बाबींचा समावेश असेल. या योजेनेचा लाभ महाराष्ट्र राज्यातील ६० वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिक यांना मिळू शकतो.

पात्रता:–

■ लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
■ वय वर्षे ६० व त्यावरील ज्येष्ठ नागरिक
■ लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.

अपात्रता:–

■ ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाता आहे.
■ ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत असे सदस्य पात्र ठरणार नाहीत. तथापि अडीच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणेद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी पात्र ठरतील.
■ ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार, आमदार आहे.
■ ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड, कॉर्पोरेशन, उपक्रमाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक सदस्य आहेत.
■ ज्यांच्याकडे चार चाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्याच्या कुटुंबातील सदस्यांचा नावावर नोंदणीकृत आहेत.
■ कोणत्याही संसर्गजन्य रोगाने ग्रस्त जसे की टीबी, हृदयाशी संबंधित श्वसन रोग, कोरोनरी अपुरेपणा, कोरोनरी थोम्बोसिस, मानसिक आजार, संसर्गजन्य कुष्ठरोग इ.
■ अर्जासोबत, ज्येष्ठ नागरिकाला सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्याने पूर्ण आरोग्य तपासणी केल्यानंतर ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (हे प्रमाणपत्र प्रवासाच्या तारखेपासून १५ दिवसांपेक्षा जास्त जुने नसावे)
■ जे अर्जदार मागील वर्षामध्ये लॉटरीत निवडले गेले होते. परंतु प्रवासासाठी आमंत्रित करुनही त्यांनी प्रवास पूर्ण केला नाही. अशा माजी अर्जदारांना देखील या योजनेत पात्र ठरविले जाणार नाही.
■ जर असे आढळून आले की अर्जदार, प्रवाशाने खोटी माहिती देऊन किंवा कोणतीही तथ्ये लपवून अर्ज केला आहे ज्यामुळे तो, तिला प्रवासासाठी अपात्र ठरते, तर त्याला, तिला कधीही योजनेच्या लाभांपासून वंचित ठेवता येईल. या योजनेच्या पात्रता व अपात्रता निकषामध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास शासन मान्येतेने करण्यात येईल.

आवश्यक कागदपत्रे–

योजनेच्या लाभासाठी ऑनलाईन अर्ज.
■ लाभार्थ्याचे आधार कार्ड, रेशनकार्ड
■ महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्याचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे– रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र, प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.)
■ सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नांचा दाखला (वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपर्यत असणे अनिवार्य) किंवा पिवळे/केशरी रेशनकार्ड
■ वैद्यकीय प्रमाणपत्र
■ पासपोर्ट आकाराचा फोटो.
■ जवळच्या नातेवाईकांना मोबाईल क्रमांक
■ या योजनेच्या अटी व शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र

लाभथ्यांची निवड:–

प्रवाशाची निवड जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय समितीद्वारे पुढील प्रक्रियेनुसार केली जाईल.
■ जिल्हानिहाय कोटा निश्चित केला जाईल. विहित कोट्यापेक्षा जास्त अर्जाच्या उपलब्धतेवर लॉटरीद्वारे प्रवाशांची निवड केली जाईल.
■ निवडलेला प्रवासी प्रवासाला न गेल्यास, प्रतिक्षा यादीत समाविष्ट असलेल्या व्यक्तीला प्रवासास पाठवता येईल.
■ निवडलेले प्रवासी आणि प्रतीक्षा यादी विभागाच्या पोर्टलवर, जिल्हाधिकारी कार्यालयावर आणि समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या सूचना फलकावर आणि योग्य वाटेल अशा इतर माध्यमांद्वारे प्रसारित केली जाईल.
■ फक्त निवडलेली व्यक्ती तीर्थयात्रेला जाऊ शकेल. तो/ती त्याच्यासोबत इतर कोणत्याही व्यक्तीला घेऊन जावू शकणार नाही.
■ जर पती–पत्नीने स्वतंत्रपणे अर्ज केला असेल आणि एकाची लॉटरीत निवड झाली असेल आणि दुसऱ्या जोडीदाराची लॉटरीत निवड झाली नसेल. तर आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे त्यांना किंवा तिला यात्रेवर पाठविण्याचा निर्णय घेऊ शकतील.

प्रवास प्रक्रिया:

■ जिल्हास्तरीय समितीने निवडलेल्या प्रवाशांची यादी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे सुपूर्द केली जाईल.
■ निवडलेल्या प्रवाशांची यादी प्रवासासाठी अधिकृत टुरिस्ट कंपनी, एजन्सीला देण्यात देईल.
■ नियुक्त अधिकृत टुरिस्ट कंपनी, एजन्सी टूरवरील प्रवाशांच्या गटाच्या प्रस्थानाची व्यवस्था करेल.
■ प्रवाशांच्या प्रवासासाठी आवश्यक त्या सुविधा आणि कोणत्या सुविधा देण्यात याव्यात, याचा निर्णय राज्य शासन घेईल.
■ सर्व यात्रेकरुंना प्रवासासाठी नियोजित स्थळी त्यांच्या स्वखर्चाने पोहोचावे लागेल.

रेल्वे, बसने प्रवास:

■ जिल्हास्तरावर स्थापन करण्यात आलेल्या समितीद्वारे प्रवाशाची सुरक्षा आणि आरोग्याशी संबंधित व्यवस्था सुनिश्चित केली जाईल.
■ प्रवास सुरु झाल्यावर, प्रवासी प्रवासाच्या मध्यभागी असल्यास त्याला प्रवास सोडायचा असेल तर त्याला सरकारकडून तशी सुविधा दिली जाणार नाही आणि विशेष परिस्थितीत, प्रवास मध्य मार्गी सोडणे आवश्यक असल्यास, उपस्थित मार्गदर्शकाच्या परवानगीने स्वखर्चाने ते करण्याची परवानगी दिली जाईल.

प्रवाशांचा गट:–

हा प्रवास केवळ एकत्रितपणे आयोजित केला जाईल. हा गट राज्य शासन किंवा शासनाने अधिकृत केलेल्या प्राधिकरण, एजन्सीद्वारे निश्चित केले जातील. शासनाने विहित केलेली किमान प्रवासी संख्या उपलब्ध झाल्यावरच कोणत्याही तीर्थदर्शनाचा प्रवास सुरु होईल.

इतर लोकांच्या प्रवासावर निर्बंध:–

या योजनेंतर्गत प्रवासासाठी निवडलेल्या व्यक्तीलाच प्रवास करता येईल. प्रवासाचा खर्च देण्याची तयारी असली तरीही तो प्रवासात इतर कोणत्याही व्यक्तीला सोबत घेऊन जाऊ शकणार नाही. फक्त निवड केलेली व्यक्ती ट्रेन आणि वाहनामध्ये प्रवास करतील आणि प्रत्येक सीट, बर्थमध्ये फक्त एकच व्यक्ती प्रवास करेल. प्रवासादरम्यान प्रवाशाला कोणतीही निवड न केलेली व्यक्ती, इतर कोणतेही नातेवाईक किंवा लहान मूल इत्यादींना सोबत नेण्याची परवानगी दिली जाणार नाही.

अतिरिक्त खर्चाबाबत:–

कोणत्याही प्रवाशाला प्रवासादरम्यान देवस्थान व विभागाने ठरवून दिलेल्या निकष, सुविधांकरिता इतर सुविधा घ्यायच्या असतील, तर त्यासाठी अतिरिक्त आर्थिक भाराची जबाबदारी संबंधित प्रवाशाची राहील.

अर्ज करण्याची प्रक्रिया:–

योजनेचे अर्ज पोर्टल, मोबाईल पद्वारे, सेतू सुविधा केंद्राद्वारे ऑनलाईन भरले जावू शकतात.
■ पात्र नागरिकास या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करता येईल.
■ ज्यांना ऑनलाईन अर्ज सादर करता येत नसेल, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा सेतू केंद्रात उपलब्ध असेल.
■ अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया विनामूल्य असेल.
■ अर्जदाराने स्वत: उपरोक्त ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असेल जेणेकरुन त्यांचा थेट फोटो काढता येईल आणि घधउ करता येईल. यासाठी अर्जदाराने कुटुंबाचे पूर्ण ओळखपत्र (रेशनकार्ड), स्वत:चे आधार कार्ड आणणे आवश्यक आहे.

अर्ज प्राप्त झाल्यानंतर, पात्र अर्जदारांची तात्पुरती यादी पोर्टल, पवर जाहीर केली जाईल. पात्र अंतिम यादीतील अर्जदार दुर्देवाने मयत झाल्यास त्या अर्जदाराचे नाव लाभार्थी यादीतून वगळण्यात येईल.

मूळ अर्जदारासह जीवनसाथी, सहाय्यकाच्या प्रवासासंबंधीच्या तरतुदी :

■ ७५ वर्षावरील अर्जदाराला त्याच्या जीवनसाथी किंवा सहाय्यकापैकी एकाला त्याच्यासोबत नेण्याची परवानगी असेल. परंतु अर्जदाराने त्याच्या अर्जात असे नमूद करणे आवश्यक आहे की, त्याचा जीवनसाथी, सहायक देखील प्रवास करण्यास इच्छुक आहे.
■ ७५ वर्षावरील अर्जदाराच्या जोडीदाराचे वय ६० वर्षापेक्षा कमी असले तरीही प्रवासी सहाय्यक अर्जदारासोबत प्रवास करु शकेल.
■ प्रवासात सहाय्यक घेण्याची सुविधा तेव्हाच उपलब्ध होईल जेव्हा अर्जदाराचे वय ७५ वर्षापेक्षा जास्त असेल आणि त्याने एकट्याने रेल्वे प्रवासासाठी अर्ज केला असेल. अर्जदाराचे वय ७५ वर्षापेक्षा कमी असल्यास सहाय्यकांना परवानगी दिली जाणार नाही.
■ सोबत प्रवास करताना जोडीदारासोबत मदतनीस घेण्याची सोय नसेल. जर दोन्ही पती–पत्नीचे वय ७५ वर्षापेक्षा जास्त असेल आणि अर्जामध्ये मदतनीस नोंदणीकृत असेल, तर तो पाठविला जाऊ शकतो.
■ सहाय्यकाचे किमान वय २१ वर्षे ते कमाल ५० वर्षे असावे. एखादा मदतनीस प्रवासात घेतल्यास, त्याला देखील त्याच प्रकारच्या सुविधा मिळतील ज्या प्रवाशाला परवानगी आहे. सहाय्यक शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रवासासाठी तंदुरस्त असावा.
■ प्रवासी, पती–पत्नी आणि सहाय्यकांनी प्रवासाशी संबंधित सर्व मार्गदर्शक तत्वांचे पालन करणे बंधनकारक असेल.

या योजनेचे संनियत्रण व आढावा घेण्याकरिता राज्यस्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे. त्याचे अध्यक्ष सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री हे असतील तर उपाध्यक्ष राज्यमंत्री असतील. तर सहसचिव/ उपसचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग हे सदस्य सचिव असतील.

जिल्हास्तरीय समितीची रचना:–

■ अध्यक्ष – संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री
■ उपाध्यक्ष – जिल्हाधिकारी
■ सदस्य – मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, आयुक्त, महानगरपालिका,मुख्यधिकारी, नगरपरिषद, पोलीस आयुक्त, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक
■ सदस्य सचिव – सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण

–मनोज शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी
ठाणे

क्रांती दिनानिमित्ताने 'घरोघरी तिरंगा' कार्यक्रमांतर्गत तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा ट्रिब्यूट कार्यक्रम

पनवेल : आजची तरूण पिढी स्वत:ला मिलेनिअर म्हणून घेते, या तरूण पिढीला देशाचा विकास करायचा आहे, देशाचा विकास करताना स्वत:चे कर्तृत्व सिध्द करायचे ,कर्तृत्व सिध्द करताना इतिहासाचे विस्मरण होऊ नये, तसेच आपल्या ज्वाज्वल्य इतिहासाच्या खुणा आपल्याला सतत तेवत ठेवण्यासाठी 'हर घर तिरंगा' कार्यक्रम राबवला जात आहे. असे प्रतिपादन मा. आमदार श्री. प्रशांत ठाकूर यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्याला ७७ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत रहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील अज्ञात नायक, क्रांतीकारक, स्वातंत्र्य संग्रामातील घडलेल्या विविध घटनांचे स्मरण व्हावे व देशभक्तीची जाज्वल्य भावना कायमस्वरुपी जनमानसात रहावी या उद्देशाने दैदिप्यमान इतिहासाचे अभिमानपूर्वक संस्मरण करण्यासाठी शासन निर्देशानूसार ०९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये 'घरोघरी तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत आज दिनांक ०९ क्रांती दिनाच्या निमित्ताने पनवेलमधील हुतात्मा स्मारक उद्यानामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

यावेळी आयुक्त मंगेश चितळे, अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, उपायुक्त बाबासाहेब राजळे, उपायुक्त संतोष वारूळे, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, माजी नगरसवेक, महापालिका अधिकारी कर्मचारी, स्वातंत्रसैनिकाचे उत्तराधिकारी, पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आयुक्त मंगेश चितळे म्हणाले, प्रत्येक नागरिकांमध्ये राष्ट्रभावना निर्माण होण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने 'घरोघरी तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे.या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने नागरीकांनी सहभागी व्हावे असे आवाहन यानिमित्ताने आयुक्तांनी केले.

भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ७७ वा वर्धापन दिन समारंभ पनवेल महानगरपालिकेमार्फत साजरा केला जाणार आहे. शासन निर्देशानूसार ०९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या कालावधीमध्ये 'घरोघरी तिरंगा' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यामध्ये आज आज दिनांक ०९ क्रांती दिनाच्या निमित्ताने तिरंगा प्रतिज्ञा, तिरंगा कॅनव्हास, तिरंगा ट्रिब्यूट कार्यक्रम पनवेलमधील हुतात्मा स्मारक उद्यानामध्ये घेण्यात आला. यामध्ये माजी सैनिक, स्वातंत्रसैनिकांचे वारसदारांना शाल व श्रीफळ देऊन सन्मानीत करण्यात आले. यावेळी स्वातंत्रसैनिकांचे उत्तराधिकारी व माजी सैनिक रावसाहेब आभाळे यांना शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानीत करण्यात आले. तसेच स्वातंत्रसैनिकांचे उत्तराधिकारी वसंत खरे, अनिल आचार्य, यतिंद्रनाथ ठाकूर, अनिल निकम,, प्रमोद पानसरे, स्वातंत्रसैनिकांचे उत्तराधिकारी यांचा यावेळी शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाची प्रस्तावना उपायुक्त कैलास गावडे यांनी केले तर सूत्रसंचाल नप्रवीण मोहकर यांनी केले. तसेच आभार सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे यांनी केले.

नवी मुंबईतील ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफी

नवी मुंबई : लोकनेते आमदार गणेश नाईक नवी मुंबईतील जिव्हाळ्याच्या मागण्यांची सोडवणूक करण्यासाठी करीत असलेल्या पाठपुराव्याला यश आले असून लोकनेते आमदार नाईक यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत गुरुवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या उच्चस्तरीय बैठकीमध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. या बैठकीला माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, माजी महापौर सागर नाईक, शासकीय, सिडको, महापालिका, एमएमआरडीए, एमएसआरडीसी, मेरीटाईम बोर्ड, एमआयडीसी आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नवी मुंबईतील ५०० चौरस फुटापर्यंतच्या घरांना मालमत्ता करमाफी देण्याची मागणी लोकनेते आमदार नाईक यांनी लावून धरली होती. ती मान्य करण्यात आली असून त्याबाबतचे आदेश मुख्यमंत्री महोदयांनी आजच्या बैठकीत दिले. या मालमत्ता करमाफीमुळे नवी मुंबईतील हजारो सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

पालिकेचे आरक्षित भूखंड डीपी मंजुरीवेळी मार्गी लागणार

नवी मुंबई महापालिकेने तयार केलेल्या विकास आराखड्यामध्ये नागरी सोयीसुविधांसाठी भूखंडांवर आरक्षण टाकले आहेत. परंतु हे भूखंड विकण्याचा सपाटा सिडकोने लावला होता. नवी मुंबईकरांना भविष्यात सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी भूखंडांची आवश्यकता असल्याने लोकनेते आमदार नाईक यांनी सिडकोच्या भूमिकेचा विरोध करून शासन स्तरावर भूखंड विक्रीवर स्थगिती आणली होती. तसेच नवी मुंबईसाठी आवश्यक भूखंड आरक्षित ठेवण्याची मागणी केली होती. ही मागणी देखील मान्य झाली असून प्रस्तावित विकास आराखडा मंजूर करतेवेळी महापालिकेकडून मागणी झालेले मात्र सिडकोने विकलेले सुविधा भूखंडाचा प्रश्न मार्गी लावावा, असे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत.

अक्षता आगासकर प्रकरणी ॲड. उज्वल निकम यांची नियुक्ती

नवी मुंबईतील अक्षता आगासकर या भगिनीच्या अत्याचार आणि हत्या प्रकरणात नराधमांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी लोकनेते आमदार नाईक यांनी हा खटला फास्ट ट्रॅकवर चालवून निष्णात वकील उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याची मागणी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडे केली होती. या मागणीनुसार आता उज्वल निकम यांना विशेष वकील म्हणून नियुक्त करण्याचे आदेश मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.

प्रकल्पग्रस्तांची बांधकामे जमिनीचा मालकी हक्क देऊन नियमित करण्याची मागणी

प्रकल्पग्रस्तांनी आजपर्यंत केलेली गरजेपोटीची सर्व बांधकामे जमिनीचा मालकी हक्क देऊन नियमित करण्याची मागणी लोकनेते आमदार नाईक यांनी या बैठकीत केली.

बीएमटीसी कामगारांसाठी ऐच्छिक योजना

सिडकोच्या बंद पडलेल्या बीएमटीसी परिवहन सेवेतील कामगारांना उदरनिर्वाहासाठी योजना लागू व्हावी याकरता लोकनेते आमदार नाईक यांचा पाठपुरावा सुरू होता. या महत्त्वाच्या विषयावरही निर्णय झाला असून १०० चौरस फुटाचे गाळे किंवा दहा लाख रुपये अशी ऐच्छिक योजना या कामगारांसाठी लागू करण्यात येणार आहे.

राज्य शासनाच्या माध्यमातून यावर्षी देण्यात येणार

७५००० गोविंदांना १० लाखांचा विमा कवच

आमदार प्रताप सरनाईक यांच्या पुढाकाराने

ठाणे : परंपरागत दहिहंडी उत्सवामध्ये मानवी मनोरे रचणाऱ्या गोविंदांचे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे या गोविंदाना विमा संरक्षण मिळावे यासाठी आमदार प्रताप सरनाईक यांनी मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी केली असता त्यांनी ती मान्य करून दहिहंडी उत्सवा दरम्यान मानवी मनोरे रचताना दुर्घटनाग्रस्त झालेल्या गोविंदाना ओरिएन्टल इन्शुरन्स विमा कंपनीच्या माध्यमातून ७५००० गोविंदाना प्रत्येकी दहा लाखाचा विमा संरक्षण देण्यात येणार आहे.

प्राचीन काळापासून सुरू असलेला व महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणारा एक महत्वाचा सण गोकुळाष्टमी म्हणजेच दहिकाला उत्सव. हा सण मोठ्या प्रमाणात लोकप्रिय असून मुंबई-ठाणे शहरांबरोबरच महाराष्ट्रातील अन्य शहरांमध्येही हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. या उत्सवात १५ ते ४० वयोगटातील तरूण-तरूणींचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. दहिहंडी (गोविंदा) उत्सवाला स्पर्धेचे रूप प्राप्त झाल्याने महाराष्ट्रातील प्रामुख्याने मुंबई-ठाण्यातील हजारो गोविंदा गोकुळअष्टमीच्या दिवशी ज्या ठिकाणी दहिहंडीचे आयोजन करण्यात आलेले असते त्या ठिकाणी थरावर-थर चढवून हंडी फोडण्याचा प्रयत्न करीत असतात. त्याचप्रमाणे या उत्सवात महिलांची देखील गोविंदा पथके सहभागी होत असतात.

दरवर्षी गुरूपोर्णिमेच्या दिवसापासून ते गोकुळाष्टमीच्या दिवसापर्यंत गोविंदा थरावर-थर चढवून हंडी फोडण्याचा सराव करीत असताना त्यामध्ये अनेक गोविंदा जायबंदी होत असतात, तर गोकुळाष्टमीच्या दिवशी हा आकडा मोठा असतो. सर्व गोविंदा पथकांची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्याने त्यांच्यावर होणार्या औषधोपचाराचा खर्च या गोविंदा मंडळास परवडत नाही. तसेच याकरिता काही सेवाभावी संस्था मदतही करतात तरीही काही ठिकाणी औषधोपचार वेळेवर न मिळाल्याने काही गोविंदा मृत्यू पावल्याच्या घटना घडलेल्या आहेत. परिणामी अपघातग्रस्त गोविंदाना व त्यांच्या कुटूंबियांना आर्थिक विवंचनेला सामोरे जावे लागते. त्यामुळे जर विम्याचे कवच मिळाल्यास गोविंदांना आर्थिक संरक्षण मिळणार आहे.

त्यानुसार ७५००० गोविंदाना ओरिएन्टल इन्शुरन्स विमा कंपनीच्या माध्यमातून विमा संरक्षण देण्यात येणार आहे. त्याचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. शासन निर्णयानुसार दहिहंडी उत्सवा दरम्यान मानवी मनोरे रचणाऱ्या गोविंदाचा अपघाती मृत्यु झाल्यास परिवाराला दहा लाख मिळतील. तसेच दोन अवयव किंवा दोन डोळे गमावल्यास दहा लाख रूपये, एक हात, एक पाय किंवा एक डोळा गमावल्यास पाच लाख तसेच कायमस्वरूपी पुर्ण अपंगत्व आल्यास दहा लाख रूपये त्याचप्रमाणे अपघातामुळे रूग्णालयीन खर्च एक लाखापर्यंत देण्यात येणार आहे. त्यामुळे आता गोविंदाना विमा कवच मिळणार असल्याने गोविंदांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

दहिहंडी उत्सवा दरम्यान मानवी मनोरे रचताना दुर्घटनाग्रस्त झालेल्या सुमारे ७५ हजार गोविंदांना दहा लाखाचा विमा संरक्षण शासनाच्या वतीने देण्यात येणार असल्यामुळे दहिहंडी समन्वय समितीने मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे साहेब व पाठपुरावा करणारे आमदार प्रताप सरनाईक यांचे आभार

'घरोघरी तिरंगा अभियानात ठाणेकरांनी उस्त्फूर्त सहभाग नोंदवावा'

ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांचे आवाहन

१३ ते १५ ऑगस्ट या काळात घर, दुकान, खाजगी आस्थापना यांच्यावर राष्ट्रध्वज फडकणार

ठाणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' या अभियानाचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. त्यात ठाणेकरांनी उस्त्फूर्तपणे सहभागी व्हावे. आपल्याकडील राष्ट्रध्वज १३ ते १५ ऑगस्ट या काळात घर, दुकान, खाजगी आस्थापना यांच्यावर फडकवावा, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

'घरोघरी तिरंगा' या अभियानाचा आरंभ ०९ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत मुंबईतील ऑगस्ट क्रांती मैदान येथे झाला. या पार्श्वभूमीवर, १५ ऑगस्टपर्यंत ठाणे महापालिका क्षेत्रातही विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. सरकारी कार्यालयांवर तिरंगी रोषणाई करण्यात येणार आहे. तसेच, नागरिकांना सहजपणे राष्ट्रध्वज खरेदी करता यावेत यासाठी त्याची उपलब्धता राहील, यावरही भर देण्यात येणार आहे.

०९ ते १५ ऑगस्ट या काळात, तिरंगा यात्रा, तिरंगा वाहन रॅली, तिरंगा मॅरेथॉन, देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. तसेच, स्वाक्षरी मोहिमेसाठी तिरंगा कॅनव्हास महत्त्वाच्या ठिकाणी उभारणे, नागरिकांनी तिरंगा सेल्फी वेबसाईटवर अपलोड करण्यास प्रोत्साहन देणे, स्वातंत्र्यसैनिक, शहीदांचे कुटुंबिय यांचा सन्मान करणारा तिरंगा ट्रीब्यूट कार्यक्रम आयोजित करणे याचाही यात समावेश आहे. बचत गट आणि उद्योजकांच्या मदतीने तिरंगा मेळ्याचेही आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक कार्यक्रमाच्या ठिकाणी तिरंगा प्रतिज्ञाही घेण्यात येणार आहे.

१३ ते १५ ऑगस्ट या काळात घर, दुकान, खाजगी आस्थापना राष्ट्रध्वज फडकावून, जास्तीत जास्त नागरिकांना या अभियानात सहभागी व्हावे आणि गत दोन वर्षांप्रमाणेच या उपक्रमास सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन या निमित्ताने करण्यात आले आहे.

टाटा सेंटर वर्कर्स व टाटा व्यवस्थापनाची सकारात्मक बैठक

पनवेल : टाटा सेंटर वर्कर्स युनियन व टाटा मॅनेजमेंट ॲक्ट्रॅक्ट खारघर यांच्या दरम्यान कामगारांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसंदर्भात खारघर येथे सकारात्मक बैठक पार पडली. या बैठकीस युनियन तर्फे युनियनचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, टाटा हॉस्पिटल मॅनेजमेंटचे संचालक पंकज चतुर्वेदी, सह संचालक डॉ. नवीन खत्री, व्यवस्थापन अधिकारी एम. आय. शेख, देवेन पितळे, कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र घरत, एडवोकेट विनायक कोळी, जनरल सेक्रेटरी प्रभाकर जोशी, खजिनदार जयदास तेलवणे, तसेच कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीमध्ये कामगारांना पगारवाढ, बोनस, कामगार आरोग्य विमा सेवा अर्थात ईएसआयसी, ग्रॅज्युएटी, सुविधा तसेच स्थानिक प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी करण्यासंदर्भात सकारात्मक चर्चा झाली. त्या अनुषंगाने या सर्व बाबींची लवकरात लवकर पूर्तता करण्याचे आश्वासन व्यवस्थापनाच्यावतीने आमदार प्रशांत ठाकूर यांना देण्यात आले. त्यामुळे टाटा सेंटर वर्कर्स युनियनमधील कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आरटीई प्रवेश मोफत तरी, इतर उपक्रमाच्या नावाखाली शाळांकडून पैसे उकळण्याचे काम सुरु

ठाणे : आरटीई अंतर्गत निवड झालेले विद्यार्थ्यांची कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर पालक जेव्हा शाळेत प्रवेश घेण्यास जात आहेत. तेव्हा शाळा प्रशासनाकडून पालकांकडे शाळेतील इतर उपक्रमांच्या नावाखाली पैशांची मागणी केली जात आहे. हे पैसे भरले नाही तर, शाळेत विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाणार नाही, असे पालकांना सांगण्यात येत आहे. त्यामुळे पालक आक्रमक झाले असून त्यांनी शिक्षणअधिकाऱ्यांकडे धाव घेतली आहे. यावर शिक्षण विभाग कारवाई करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नवी मुंबई शहरातील आरटीई प्रवेशित बालकांचे पालक एकत्रित येत त्यांनी नवी मुंबई महापालिका शिक्षण अधिकारी यांना पत्र लिहिले आहे.

शैक्षणिक वर्षे २०२४ -२५ या वर्षाची आरटीई कायद्याअंतर्गत होणाऱ्या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया सुरु आहेत. ठाणे जिल्ह्यातून आरटीईसाठी ६४३ शाळा पात्र झाल्या असून ११ हजार ३३९ जागांसाठी ही प्रक्रिया पार पडत आहे. या जागांसाठी ठाणे जिल्ह्यातून विविध भागातून १९ हजार ५६८ अर्ज प्राप्त झाले होते. यातून पहिल्या यादीत ९ हजार ५९७ विद्यार्थ्यांची निवड झाली होती. या विद्यार्थ्यांची प्रवेश निश्चित करण्याची प्रक्रिया सध्या सर्वत्र सुरु आहे. कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यावर ज्या शाळेत आपल्या पाल्याची निवड झाली आहे, त्या शाळेत प्रवेश निश्चित करण्यासाठी पालक जाताच, त्यांच्याकडे क्रीडा, नृत्य, गायन, साहसी खेळ, सहल अशा विविध उपक्रमांची एकत्रित शुल्क भरण्यास सक्ती केली जात आहे. या उपक्रमांसाठी ठाणे जिल्ह्यातील काही शाळांमध्ये १० हजार तर, काही शाळांमध्ये १५ ते २० हजार रुपये शुल्क आकारले जात आहे. शिवाय पालकांनी हे शुल्क भरल्यानंतर त्यांना कोणतीही पावती दिली जात नसल्याची माहिती उघडकीस आली आहे. तसेच हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने आकारले जात नसून रोख रक्कम भरण्यास पालकांना सांगितले जात आहे. त्यामुळे या खासगी शाळा बेकायदेशिर रित्या आरटीईच्या विद्यार्थ्यांकडून पैसे उकाळत असल्याचा आरोप पालकांकडून केला जात आहे.

शिक्षणाचा मूलभूत अधिकार हा फक्त कागदावरच मोफत राहिला आहे. आरटीईमध्ये विद्यार्थ्यांची निवड होऊन सुद्धा शाळांचा मनमानी कारभार सुरु आहे. जिल्ह्यातील प्रत्येक शाळेत इतर उपक्रमाच्या नावाखाली पालकांकडून पैसे उकळण्याचे काम सुरु आहे. अशा मुजोर शाळांची प्रशासनाने मान्यता रद्द केली पाहिजे.

नवी मुंबईतील विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच स्वच्छतेचे संस्कार रुजावेत व दिंडीसारख्या परंपरेच्या माध्यमातून त्यांना संस्कृतीची ओळख व्हावी यादृष्टीने नवी मुंबई पालिका क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'स्वच्छता दिंडी' या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचा महाअंतिम सोहळा वाशी येथील विष्णुदास भावे नाटयगृहात प्रचंड जल्लोशात संपन्न झाला.

वसईत १२ ऐवजी ७ उड्डाणपूल होणार

सर्वेक्षणानंतर रचनेत बदल, ३ पूल एकमेकांना जोडणार

वसई : शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ उड्डाणपुलांच्या रचनेत आता बदल करण्यात आला आहे. सलग वाहतूक करता यावी यासाठी १२ पैकी ३ उड्डणपूल एकमेकांना जोडण्यात येणार असून उर्वरित २ उड्डाणपूल आता रेल्वे उड्डाणपुलात रुपांतरीत केले जाणार आहे. यामुळे १२ उड्डाणपुलांऐवजी शहरात ७ उड्डाणपूल होणार आहेत. वसई विरार शहराची लोकसंख्या वाढत असून नागरिकरण झपाट्याने वाढत आहे. शहरातील रस्ते अरुंद असून त्यावर वाहनांची संख्या वाढत आहे. त्यामुळे दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शहरात अंतर्गत वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी १२ उड्डाणपुलांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. पहिला प्रस्ताव २०१४-१५ मध्ये देण्यात आला होता. तेव्हा या १२ उड्डाणपुलांसाठी अडीचशे कोटींचा खर्च अपेक्षित होता. नुकतीच एमएमआरडीएने शहरातील विस्तारीत पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत रस्ते आणि उड्डाणपुलांसाठी २ हजार ३२ कोटींच्या कामांना प्रशासकीय मान्यता दिली होती. त्यानुसार एमएमआरडीएच्या अधिकार्यांनी वसई विरारमध्ये भेट देऊन या उड्डापुलांच्या कामाची पाहणी केली. त्यावेळी १२ प्रस्तावित उड्डाणपुलांच्या रचनेत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला.

१२ ऐवजी होणार ७ उड्डाणपूल

या उड्डाणपुलांमध्ये माणिकपूर नाका, बाभोळा नाका, वसंत नगरी, रेंज ऑफीस, (वसईत) पाटणकर पार्क, लक्ष्मी शॉपिंग सेंटर, चंदन नाका (नालासोपारा) बोळींज खारोडी नाका, सायन्स गार्डन, फुलपाडा, मनवेलपाडा, नारिंगी (विरार) अशा १२ उड्डापुलांचा समावेश होता. मात्र सर्वेक्षणानंतर एकाच रस्त्यावर दोन पूल असल्याने ते एकत्रित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार विरारचा खारोडी नाका बोळींज-सायन्स गार्डन उड्डाणपूल आणि मनवेल पाडा- फुलपडा हे उड्डाणपूल एकमेकांना जोडले जाणार आहे. तर वसईतील माणिकपूर नाका आणि बाभोळा पूल एकमेकांना जोडले जाणार आहे. नालासोपारामधील लक्ष्मी शॉपिंग सेंटर जंक्शन आणि श्रीप्रस्थ पाटणकर पार्क येथील प्रस्तावित उड्डाणपूल रेल्वे उड्डाणपुलात रुपांतरीत केले जाणार आहे. त्यामुळे पुलांची संख्या १२ वरून ७ होणार आहे. वाहनचालकांच्या सोयींसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे वाहनचालकांना सलग प्रवास करता येईल आणि प्रवास अधिक सुखकर होईल, अशी माहिती वसई विरार महापालिकेचे कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे यांनी दिली. उड्डाणपुलांचे ठिकाण (लोकेशन) तेच आहे मात्र संख्या कमी झाली आहे. नव्या रचनेमुळे अंदाजित खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

हे ३ उड्डाणपूल जोडले जाणार

१) माणिकपूर नाका- बाभोळा नाका (वसई)
२) मनवेलपाडा- फूलपाडा (विरार)
३) सायन्स गार्डन- खारोडी नाका (विरार)

हे ४ पूल स्वतंत्र राहणार

१) वसंत नगरी (वसई)
२) नारिंगी साईनाथ नगर (विरार)
३) रेंज ऑफिस गोखिवरे (वसई)
४) चंदन नाका (नालासोपारा)

राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत कार्यशाळा संपन्न

ठाणे : पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत दोन दिवशीय कार्यशाळा दिनांक ६ ऑगस्ट व ७ ऑगस्ट रोजी रोटरी कम्युनिटी सेंटर, वडवली, अंबरनाथ (पूर्व) या ठिकाणी यशस्वीरित्या पार पडली. या कार्यशाळेच्या अध्यक्ष स्थानी प्रादेशिक सह आयुक्त पशुसंवर्धन मुंबई विभाग डॉ. प्रशांत कांबळे तर या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद ठाणे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते उपस्थित होत्या.

कार्यशाळेची सुरुवात ही राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत येणाऱ्या योजनांच्या बाबतच्या मराठीतील पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. आयुक्त कौस्तुभ दिवेगावकर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषद ठाणे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांचे शुभ संदेश या कार्यशाळेस लाभले.

या योजनेत ऑनलाईन पद्धतीने कशा प्रकारे अर्ज केला जातो याविषयी प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. नरेश बांगर यांनी कुक्कुटपालन विषयीच्या योजने बाबत मार्गदर्शन केले.

राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत पात्र झालेले लाभार्थी विकास रामचंद्र जाधव यांनी योजनेविषयीचे त्यांचे अनुभव या कार्यशाळेमध्ये कथन केले. ही कार्यशाळा आयोजित करण्यामध्ये जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. वल्लभ जोशी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. समीर तोडणकर, सहाय्यक आयुक्त डॉ. लक्ष्मण पवार, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. दीपक कंधारे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. अजित हिरवे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. अमोल सरोदे, सहायक आयुक्त डॉ. प्रीतम भोईर तसेच अंबरनाथ तालुक्यातील सर्व पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, सर्व कर्मचारी व मोठ्या संख्येने पशुपालक उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वी करण्यामध्ये डॉ. किर्ती डोईजोडे, डॉ. देवश्री जोशी, डॉ. अनिल धांडे यांनी विशेष कामगिरी केली आहे. कार्यशाळेचे निवेदन डॉ.धनंजय मादळे व अक्षता गायकवाड यांनी केले तसेच आभार प्रदर्शन डॉ. प्रीतम भोईर यांनी केले.

युवा मोर्चा ग्रामीण मंडलाची संघटनात्मक नियुक्ती जाहीर

पनवेल : आनंद ढवळे यांनी पनवेल ग्रामीण मंडल युवा मोर्चाची संघटनात्मक नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. त्यानुसार ग्रामीण मंडल सरचिटणीसपदी विश्वजीत पाटील, निलेश हातमोडे, उपाध्यक्षपदी राहुल पोपेटा, विश्वास म्हात्रे, प्रकट कडू, धनंजय पाटील, कोषाध्यक्षपदी अमर शेळके व नितीन भोईर, चिटणीसपदी कल्पेश पाटील, मंगेश लबडे, सचिन पाटील, चेतन सुरते, रोशन धर्मा पाटील, रोशन मधुकर पाटील, भरत फराड सदस्यपदी मुकेश फडके व लहू मुंढे यांची तर प्रभाग १ अध्यक्षपदी नितेश पाटील, प्रभाग २ अध्यक्षपदी शुभम खानावकर, वावंजे पंचायत समिती अध्यक्षपदी निलेश दाढावकर, चिंध्रण पंचायत समिती अध्यक्षपदी दीपक रिकामे, आदई पंचायत समिती अध्यक्षपदी निलेश शेळके, पालीदेवद पंचायत समिती अध्यक्षपदी महेश केणी, पळस्पे पंचायत समिती अध्यक्षपदी मुकेश भगत, कोन पंचायत समिती अध्यक्षपदी संदेश पाटील, गुळसुंदे पंचायत समिती अध्यक्षपदी नरेंद्र कोंडीलकर, पोयंजे पंचायत समिती अध्यक्षपदी राजेश लबडे, करंजाडे अध्यक्षपदी सत्यजित पाटील, उलवे नोड अध्यक्षपदी धीरज उलवेकर, केळवणे पंचायत समिती अध्यक्षपदी मनोज ठाकूर तर आपटे पंचायत समिती अध्यक्षपदी कल्पेश कोंडीलकर यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

नवी मुंबई जिल्हा भाजपा विस्तारित कार्यकारणी बैठकीत विधानसभा विजयाचा निर्धार

नवी मुंबईतील मजबूत भाजपा संघटनचे झाले दर्शन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचा ठराव संमत

नवी मुंबई : नवी मुंबई जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या विस्तारित कार्यकारिणीची बैठक आज ऐरोली येथे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या उत्स्फूर्त आणि उत्साही प्रतिसादामध्ये पार पडली. विधानसभा विजयाचा निर्धार यावेळी करण्यात आला. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा आणि विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनता महायुतीला स्पष्ट जनादेश देईल, असा विश्वास दर्शक ठराव यावेळी मंजूर करण्यात आले.

या जिल्हा अधिवेशनाला लोकनेते आमदार गणेश नाईक, भाजपा प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, प्रदेश महिला उपाध्यक्षा प्राध्यापिका वर्षा भोसले, माजी खा. डॉ. संजीव नाईक, नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक, ऐरोली विधानसभा निवडणूक प्रमुख सागर नाईक यांच्यासह भाजपाचे प्रदेश पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी, मंडळ, प्रकोष्ट, सेल मोर्चाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आजी-माजी पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अधिवेशनाच्या निमित्ताने नवी मुंबई जिल्हा भाजपाचे मजबूत संघटन पहायला मिळाले.

अधिवेशनाच्या सुरुवातीला अलीकडेच दिवंगत झालेले भाजपाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. नवी मुंबई भाजपा जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी आपल्या प्रास्ताविकामध्ये नवी मुंबईतील भाजपाच्या आजवरच्या वाटचालीचा समग्र आढावा घेत विधानसभा निवडणुकीमध्ये यश प्राप्त करण्याच्या दृष्टीने पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या मनात सकारात्मक ऊर्जेची आणि विश्वासाची पेरणी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात विकसित भारत घडतो आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती होते आहे.

कोरोनाच्या संकट काळात पंतप्रधान मोदी यांनी देशवासीयांना मदतीचे आवाहन केल्यानंतर नवी मुंबईत स्वतःचा जीव धोक्यात घालून कोरोना बाधितांची मदत करण्यासाठी सर्वात पुढे जर कोण होते असे विचारले तर भाजपाचे कार्यकर्ते होते, असेच उत्तर येईल. मागील एक वर्षात पन्ना प्रमुख, बूथ स्तरापासून ते जिल्हास्तरापर्यंत प्रदेश आणि केंद्रीय पातळीवरून पक्षाकडून आलेले पंधराशे पेक्षा अधिक कार्यक्रम उपक्रम राबविण्यात आले आहेत. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व आजी-माजी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी त्यांचे शंभर टक्के योगदान दिलेले आहे. या कालावधीत झालेल्या निवडणुकांमध्ये नवी मुंबई भाजपाने महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. मोदीजींना पंतप्रधान करण्यासाठी ठाणे लोकसभेतून महायुतीच्या उमेदवाराला विजयासाठी आघाडी मिळवून दिली. कोकण पदवीधर मतदारसंघातून भाजपा उमेदवाराच्या विजयासाठी सर्व आजी-माजी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये दोन्ही विधानसभा मतदारसंघातून विजय मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. निवडणूक लढताना आपल्याला विरोधकांच्या फेक नरेटीव्हचा भांडाफोड करायचा असून पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सर्व प्रकारच्या प्लॅटफॉर्मवर सतर्क राहून व्यक्त व्हायला पाहिजे, असे आवाहन देखील जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी यावेळी केले.

लोकनेते आमदार गणेश नाईक यांनी यावेळी मार्गदर्शन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामुळे जगात भारताचा आदरयुक्त दरारा वाढल्याचे नमूद केले. मुख्यमंत्री एकनाथशिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होत असून सर्व घटकांचे कल्याण होत असल्याचे ते म्हणाले. आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये दोन्ही मतदारसंघातून मोठ्या मताधिक्याने भाजपाचा विजय होईल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१